अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई-३०
दुरध्वनी क्र.- ०२२-२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :- ०६/०८/२०२४

**-: प्रेसनोट :-**

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | बृहन्मुंबई विभाग. |
| गुन्हा नोंद क्रमांक | २२/२०२४. |
| कलम | कलम ७ भ.प्र. अधिनियम १९८८. |
| आरोपी लोकसेवक | श्री. उध्दव नवनाथ गर्जे, ३६ वर्षे, लिपीक,<br>घन कचरा व्यवस्थापन, एन वॉर्ड, बृहन्मुंबई महानगर पालिका, घाटकोपर पुर्व, मुंबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. ५,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. ५,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे सफाई कामगार म्हणून बृहन्मुंबई महानगर पालिकेत कर्तव्यास असून त्यांना नियत वयोमानानुसार २०२२ साली पदोन्नती देय होती. त्यानुसार तक्रारदार यांनी बीएमसी 'एन वॉर्ड', घाटकोपर येथील संबंधीत विभागास रितसर अर्ज केला होता. सदर पदोन्नती देण्यासाठी एन वार्ड येथील लिपीक श्री. उध्दव गर्जे यांनी तक्रारदार यांचे प्रथम पदोन्नतीचे काम करुन देतो व ऑगस्ट महिन्यात पगार झाल्यानंतर ५०००/- रुपये दे असे बोलुन तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ०१/०८/२०२४ रोजी ला.प्र.वि. मुंबई येथे समक्ष हजर राहुन लोकसेवकाविरूध्द तक्रार दिली.<br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०५/०८/२०२४ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांना दिनांक ०६/०८/२०२४ रोजी येण्यास सांगितले. त्याप्रमाणे दिनांक ०६/०८/२०२४ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे रु. ५,०००/- लाचेची मागणी करून ती स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले, म्हणून श्री. उध्दव नवनाथ गर्जे, लिपीक, बृहन्मुंबई महानगर पालिक, घ.क.व्य., एन वॉर्ड, घाटकोपर पुर्व, मुंबई यांच्याविरूध्द ला.प्र.वि. मुंबई येथे भ्र.प्र.अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( नितीन दळवी )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोलफ्री क्र. १०६४, दुरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
वेबसाईट - acbmaharashtra.gov.in, ईमेल :- acbwebmail@mahapolice.gov.in
ईमेल - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
फेसबुक - www.facebook.com - Maharashtra ACB
मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net